# बृहन्मुंबई महानगरपालिका

## लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय, शीव, मुंबई – 22

क्र. लोटिरु/33876/ रुप्र

दिनांक: 04/02/2026

## जाहिरात

मा. महानगरपालिका आयुक्त यांच्या मंजुरी क्र. एमजीसी/एफ/6647 दि.30.05.2025 नुसार, लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालयाकरिता खालील नमूद करण्यात आलेली विविध पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने भरावयाची आहेत. सदर पदांकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in/For prospects/Careers-All या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता/ पात्रता धारण करीत असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

लोटिमस रुग्णालय, कॉलेज इमारत, तळ मजला, रोखपाल विभाग (रुम.नं.15) येथे रुपये 790/- + 18% जीएसटी रु.143/- = एकूण रु. 933/- इतके अर्ज शुल्क दि. 05/02/2026 ते 13/02/2026 पर्यत कार्यालयीन वेळेत (सर्व शनिवार तसेच रविवार व सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी 11:00 ते दुपारी 03.00 वाजेपर्यत भरून त्याची मूळ पावती अर्जासोबत जोडावी. पूर्ण भरलेल्या अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेची सर्व कागदपत्रे जोडून लो.टि.म.स.रुग्णालयाच्या आवक/जावक विभागात दि. 13/02/2026 रोजी संध्याकाळी 05.30 पर्यंत सादर करावीत.

अर्ज करीत असलेल्या पदासाठीची विहीत अर्हता / अटींची पुर्तता उमेदवार करीत असून सदर कंत्राटी पदाकरीता ते पात्र आहेत याची खातरजमा अर्ज सादर करण्यापूर्वी उमेदवारांनी स्वत: करावयाची आहे.

कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या विविध पदांचा तपशील खालीलप्रमाणे –

**कंत्राट कालावधी : नेमणूकीच्या तारखेपासुन दि. 31.03.2027 पर्यंत**

| अनु. क्र. | पदाचे नाव | एकूण पदे | ठोक मानधन (प्रति माह) | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रयोगशाळा सहाय्यक (Laboratory Assistant) | 05 | रु. 16,000/- | 1)उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा रसायनशास्त्र (Chemistry) /सुक्ष्मजीवशास्त्र (Microbiology)/ जीवरसायनशास्त्र (Biochemistry) /जैविकतंत्रज्ञान (Biotechnology) या मुख्य विषयासह विज्ञान शाखेतील पदवी (Degree in B.Sc.) उत्तीर्ण असावा.<br>2) उमेदवारास महानगरपालिकेच्या खात्यामार्फत घेण्यात येणारी व्यवसाय चाचणी (Trade Test) परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. |
| *टिप- सदर 05 पदे लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालयाकरिता प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून रक्तपेढी विभागात भरावयाची असल्याने तीनही पाळयांमध्ये काम पहावे लागेल.* | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2 | डायलिसीस तंत्रज्ञ | 05 | 20,000/- | मान्यताप्राप्त विद्यापीठातुन बी.एस.सी (डायलिसीस टेक्नोलॉजी) उत्तीर्ण किंवा 12 वी उत्तीर्ण करुन 1 वर्ष/ 6 महिन्यांचा डायलिसीस टेक्नोलॉजी या विषयातील उत्तीर्ण झालेले प्रमाणपत्र. |
| *टिप- लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालयाकरिता डायलिसीस तंत्रज्ञ पदे भरावयाची असुन निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना तीनही पाळयांमध्ये काम पहावे लागेल.* | | | | |
| 3 | मुके व बहिरे यांच्या शाळेकरिता शिक्षक | 2 | रु. 25,000/- | 1) मान्यताप्राप्त विद्यापीठातुन कला किंवा विज्ञान शाखेची पदवी<br>2) बी.ए.आर. किंवा सी.आय.टी.डी. किंवा कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेकडुन कर्णबधिरांच्या विशेष शिक्षणातील पदविका<br>किंवा<br>कर्णबधिरांना शिकवण्याच्या 3 महिन्यांच्या विशेष प्रात्यक्षिक प्रशिक्षणासह ऑडिओलॉजी आणि स्पीच थेरपीमध्ये पदवीधर (बी.एस.सी.) असणे आवश्यक आहे.<br>3) कर्णबधिरांच्या कोणत्याही शाळेत किमान एक वर्षाचा अध्यापनाचा अनुभव. योग्य शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवाराच्या बाबतीत अनुभवाची अट शिथिल केली जाऊ शकते. मराठी, गुजराती शिकवण्याची क्षमता असलेल्या उमेदवारांना प्राधान्य.<br>4) उमेदवार 100 गुणांची प्रश्नपत्रिका असलेली मराठी भाषा विषयाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता 10वी) किंवा मराठी विषय असलेली तत्सम परिक्षा (उच्च स्तर/ निम्न स्तर) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा निकषानुसार उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. |
| 4 | व्यवसायोपचारतज्ञ | 01 | रु. 40,000/- | 1.उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा B.Sc (OT) बी.एस.सी. (व्यवसायोपचार)/B.O.Th (बॅचलर ऑफ ऑक्युपेशनल थेरपी) पदवीधारक असावा.<br>2.उमेदवार महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद, मुंबई येथे नोंदणीकृत असावा. |

तसेच वरिल अनु क्र. 1, 2, 3 व 4 मधील उमेदवारांना खालील अर्हता असणे गरजेचे आहे.

1) उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत किमान 50 गुणांची प्रश्नपत्रिका असलेली मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. (अनु क्र. 3 वगळून)

2) उमेदवार 'डीओईएसीसी' सोसायटीचे 'सीसीसी' किंवा 'ओ स्तर' किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर' स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे 'एम.एस.सी.आय.टी.' किंवा 'जीईसीटी' चे प्रमाणपत्र धारक असावा किंवा सदर प्रमाणपत्र सादर करण्यास सुट देण्याकरीता शासनाने वेळोवेळी संगणक हाताळणी/वापराबाबत मान्यता दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. तथापि नियुक्तीच्यावेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तिने 'एम.एस.सी.आय.टी.' ही परिक्षा नेमणूकीच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत उत्तीर्ण होऊन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**वयोमर्यादा**: <u>उमेदवाराचे वय दि. 05/02/2026 रोजी 38 वर्षापेक्षा जास्त असता कामा नये.</u>

**<u>निवडीचे निकष व कार्यपध्दती:</u>**

1. सदर पदाची विहित केलेली शैक्षणिक अर्हता व मुलाखतीच्या प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. गुणवत्ता यादीतील उमेदवारामधून निवड यादी तयार करण्यात येईल. सदर गुणवत्ता यादी एक वर्षाकरिता वैध आहे.
2. मुलाखतीचे ठिकाण, दिनांक व वेळ : अर्जदाराने अर्जात नमुद केलेल्या <u>email</u> वर दोन दिवस आधी कळविण्यात येईल.
3. अर्ज करण्याचा व अर्जाचे शुल्क भरण्याचा कालावधी : दि. 05/02/2026 ते 13/02/2026

   अर्जाचे (ना परतावा ) शुल्क : रुपये 790/- + 18% जीएसटी रु. 143/- = एकूण रु. 933/-
4. सर्वसाधारण अटी:
   - उमेदवाराने अर्जामधे भ्रमणध्वनी क्रमांक, नित्य वापरात असलेला वैध (valid) ई-मेल आयडी अणि पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोड सह) याची सुस्पष्ट व पुर्ण नोंद करावी.
   - पात्र उमेदवारांना कंत्राटी नियुक्ती देण्यापूर्वी संबंधीत पोलीस ठाण्याकडून उमेदवाराचे चारित्र्य पडताळणी व पुर्वचारित्र्य प्रमाणपत्र प्राप्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
   - कंत्राटी कर्मचा-यांना देण्यात येणारे ठोक मानधनाव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा महागाई भत्ता, घरभाडे भत्ता इत्यादी आर्थिक लाभ अनुज्ञेय असणार नाही.
   - उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अधःपतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास, तसेच उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे.
   - त्यांच्या कंत्राटी सेवेच्या कालावधीमध्ये दर 90 दिवसापूर्वी एक दिवसाचा सेवा खंड देण्यात येईल.
   - उमेदवारास नियुक्त केलेल्या विभागातील सत्रांनुसार साप्ताहिक रजा व एका कॅलेंडर वर्षाला 15 नैमित्तिक रजा अनुज्ञेय असेल, त्या व्यतिरिक्त इतर कोणतीही रजा अनुज्ञेय नाही.
   - कंत्राटी कालावधीत त्यांचे काम समाधानकारक न आढळल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता त्यांच्या सेवा समाप्त करण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता, लोटिमस रुग्णालय यांच्याकडे राहील.
   - सदर कंत्राटी तत्त्वावरील पदधारकाच्या नियुक्ती कालावधीमध्ये उमेदवाराने शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती तात्काळ रदद करण्यांत येईल.
   - निवडप्रकिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्यास किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रददबातल करण्यांत येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यांत येईल.
   - त्यांची नेमणूक करार पध्दतीची असल्यामुळे त्यांना कोणत्याही न्यायालयात दाद मागता येणार नाही.
   - नियुक्तीचे वेळी उमेदवाराकडुन रु. 500/- बॉंड पेपर वर करारनामा करुन घेण्यात येईल.
   - नियुक्त झालेल्या उमेदवारास मनपामध्ये कायमस्वरुपी सेवेसाठी कोणताही हक्क सांगता येणार नाही तसेच त्यांना नियमित सेवेचे कोणतेही फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.
   - ते दररोज नियमाने त्यांच्या कर्तव्याच्या वेळेनुसार बायोमॅट्रिक करतील अन्यथा त्यांना गैरहजर धरण्यात येईल. त्यांची विना परवानगी गैरहजेरी विना वेतनी गैरहजेरी (LWP) करण्यात येईल.
   - कोणत्याही कारणास्तव निवड झालेल्या उमेदवारास पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने 15 दिवसांची पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे.

- लोकमान्य टिळक महानगरपालिक सर्वसाधारण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय, शीव, मुंबई – 22 येथे रुग्णालयात कोणत्याही विभागात तीन पाळीत काम करावे लागेल.
- उमेदवारास मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
- प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवडप्रकिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता, लोटिमस रुग्णालय यांना आहेत.

विशेष सुचना :

अ) यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले/प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही.

ब) अर्जाचे विहित मुल्य भरुन त्याची पावती जोडल्याशिवाय अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

इ) टपालाने आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

सोबत : अर्जाचा नमुना

सही/-03.02.2026
अधिष्ठाता
लो.टि.म.स. रुग्णालय, शीव,
मुंबई – 400 022.

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

लो.टी.म. वैद्यकीय महाविद्यालय व सर्वसाधारण रूग्णालय, शीव, मुंबई 400022

दूरध्वनी क्रं. – 02224066381–89/ 022 28541017-18.

**अर्जाचा नमुना**

पदाचे नाव:

प्रति,

अधिष्ठाता,

लो.टी.म. स.वैद्यकीय महाविद्यालय व

सर्वसाधारण रूग्णालय, शीव,

मुंबई – 400022.

बृहन्मुंबई महानगरपालिकेत लो.टी.म.स. वैद्यकीय महाविद्यालय व सर्वसाधारण रूग्णालय, शीव, मुंबई 400022 मध्ये ________________ पदाकरिता दिनांक ________________ च्या जाहिरातीनुसार मी खाली सही करणार विनंती अर्ज करत आहे. माझी सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे :

1) (अ) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) : ____________________________________________________

2) पत्ता (कायमचा) : ____________________________________________________________________

________________________________________________________________________________

3) पत्ता (पत्रव्यवहाराचा) :_______________________________________________________________

4) पदाचे नाव ____________________________

5) जन्म दिनांक: ___________________________________

6) वजन: ___________________ किलो उंची: _______________________ सें.मी.

7) वय:____________________________

8) शैक्षणिक अर्हता: ______________________________________________________________

मी यान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांवर व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास माझी काहीही तक्रार राहणार नाही.

सोबत : प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रती

दिनांक

आपला / आपली विश्वासू,

अर्जदाराची सही

(अर्जदाराचे नाव)

# बृहन्मुंबई महानगरपालिका

लो.टी.म. वैद्यकीय महाविद्यालय व सर्वसाधारण रूग्णालय, शीव, मुंबई 400022

दूरध्वनी क्रं. - 0224063081-89

## वैयक्तिक माहितीपत्र (BIO-DATA)

1) संपूर्ण नाव (आडनांव प्रथम) मराठीत: ______________________________

2) वडिलांचे संपूर्ण नाव: ______________________________

3) विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव (महिलांकरिता) : ______________________________

4) पत्ता : ______________________________

______________________________

5) दूरध्वनी क्रमांक: ______________________________

6) इ – मेल आय डी : ______________________________

7) लिंग– पुरुष ______________ स्त्री ______________

8) जन्मदिनांक: दिनांक__________ महिना__________ वर्ष __________

दिनांक ______________ रोजी असलेले वय __________ महिने __________ दिवस_____

9) शैक्षणिक अर्हता:

| शैक्षणिक अर्हता | शालांत परीक्षा मंडळ/विद्यापीठाचे नाव | गुणांचा तपशील | | | उच्च माध्यमिक शालांत परीक्षेतील गुण | | उमेदवार किती प्रयत्नात परीक्षा उत्तीर्ण झाला |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | पैकी | टक्केवारी | मराठी | इंग्रजी | |
| दहावी | | | | | | | |
| बारावी | | | | | | | |
| पदवी | | | | | | | |
| पदविका | | | | | | | |
| पदव्युत्तर | | | | | | | |
| फेलोशिप | | | | | | | |

10) अनुभव: ______________________________

11) स्थानिक पोलीस ठाण्याचा पूर्ण पत्ता: ______________________________

______________________________

12) उंची: ____ फूट __ इंच, वजन: ______ कि.ग्रा., शरीराची ठेवण: किरकोळ / मध्यम / सुदृढ वर्ण: __________ नेत्र वर्ण: __________ वैयक्तिक खूण: ______________

13) संगणकविषयक ज्ञान: M S-CIT किंवा शासनाने विहित

केलेल्या संगणक विषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र: आहे / नाही

14) उमेदवार सध्या नोकरी करीत आहे किंवा नाही ? होय / नाही

असल्यास त्याबाबतचा तपशील: ____________________________________________

________________________________________________________________________

15) उमेदवाराविरुद्ध पोलीस चौकशी / न्यायालयिन प्रकरण प्रलंबित / प्रस्तावित आहे का ? असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा. होय / नाही

16) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? शिक्षा झाली असल्यास, शिक्षेचा तपशील नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी. होय / नाही

आपला / आपली विश्वासू,

अर्जदाराची सही
(अर्जदाराचे नाव)

दिनांक: